## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक – संगाबाअवि/१/१०९/ २-४११ /२०२० दिनांक – ०९ जुलै, २०२०

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**
**संचारबंदी शुक्र. सायं.७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत...**

संदर्भ – जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्रमांक कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि ३७७/२०२०, दिनांक ०६.०७.२०२०

कोव्हीड-२०१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांनी संदर्भांकीत दिलेले आदेश यासोबत जोडण्यात येत असून त्यात नमुद आदेशाचे पालन करण्यात यावे

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे काटेकोरणे पालन करावे व सदर सूचना त्यांच्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी.
३) संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
४) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व अमरावती जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
५) मा.कुलगुरुंचे स्वियं सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
६) मा.प्र-कुलगुरुंचे स्वियं सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
७) कुलसचिवांचे स्वियं सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**
**कॅम्प अमरावती ४४४ ६०२**
**(गृह विभाग)**
☎ : ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८६३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in

क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- ३७७/२०२०

दिनांक :- ०६/०७/२०२०

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील लॉकडाऊन सूचनापत्र क्र. डिएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि. २९/०६/२०२०
४. या कार्यालयाकडील आदेश क्र. क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/काचि-३७३/२०२० दि. ३०/०६/२०२०
५. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-३५६/२०२० दि. ०१/०६/२०२०
६. या कार्यालयाकडील आदेश क्र. क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-३६१/२०२० दि. २३/०६/२०२०

## आदेश

### (संचारबंदी शुक्र. सायं. ७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत)

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासन यांचेकडील संदर्भिय क्र. ३ च्या सूचनापत्रात नमुद केल्याप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार संदर्भिय क्र. ४ अन्वये दि. ०१/०७/२०२० ते ३१/०७/२०२० पर्यंत संचारबंदीचे आदेश पारीत करण्यात आले होते

तथापी अमरावती शहर व ग्रामीण भागामध्ये दिवसेंदिवस कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढत असल्याने व त्यांची रुग्णसंख्या नियंत्रणासाठी आणि कोरोना विषाणूच्या संक्रमणाची साखळी तोडण्याकरीता चाचणी वाढविणे, प्रत्येक घरनिहाय सर्व्हेक्षण करणे, लक्षणे असलेल्या व्यक्तींना संस्थानात्मक विलगीकरण करणे, दंडात्मक कारवाई करणे इ. कार्यवाही सुरु आहे. त्याकरीता सर्व नागरिकांनी काळजी घेऊन आवश्यक काम असल्याशिवाय घरातच सुरक्षित राहणे आवश्यक आहे. संक्रमणासंदर्भात उपाययोजना म्हणून आठवडयातील शुक्रवार सायंकाळी ७.०० वा. पासून ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत संचारबंदी घोषित करणे आवश्यक वाटत असल्याने मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी अमरावती, संपूर्ण अमरावती शहर व ग्रामीण भागात आठवडयाच्या दर शुक्रवारी सायंकाळी ७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत संचारबंदी राहील असे आदेशित करीत आहे.

**सदर संचारबंदीच्या कालावधीत दर आठवडयातील शुक्रवार सायंकाळी ७.०० वा. पासून ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत खालील नमुद केल्याप्रमाणे सेवा हया संपूर्णपणे बंद राहतील.**

१. शहरी व ग्रामीण भागातील सर्व मुख्य बाजारपेठा हया उपरोक्त नमुद केलेल्या कालावधीत संपूर्णपणे बंद राहतील.
२. यापूर्वीच्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे सर्व प्रकारचे बाजार, बाजारपेठ क्षेत्रामधील असलेली दुकाने, मॉल्स, मार्केट कॉम्प्लेक्स येथील पी-०१, पी-०२ या तत्वावर असलेलली (रस्ता/गल्ली यांच्या एका बाजूला तसेच रस्ता/गल्ली यांच्या दुसऱ्या बाजूला असलेली दुकाने) अशी दोन्ही बाजुची दुकाने बंद राहतील. इतर सर्व प्रकारची मार्केट बंद राहतील.
३. जिवनावश्यक वस्तु मध्ये समावेश असलेली किराणा, धान्य दुकाने बंद राहतील.

४. अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीच्या अधिसूचित भाजीपाला व फळ यार्ड हे सुध्दा या कालावधीत बंद राहतील.
५. अमरावती शहर व ग्रामीण भागात असलेली सर्व पर्यटन स्थळे बंद राहतील. पर्यटन स्थळी नागरिकांनी गर्दी करु नये अन्यथा त्यांचेवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी.
६. अमरावती शहर व ग्रामीण जिल्हयातील कार्यरत असलेल्या सर्व राष्ट्रीयकृत सरकारी बँक, खाजगी बँक, सहकारी संस्था, पतपेढी संस्था, व आर्थिक बाबींशी संबंधित असलेल्या सर्व वित्तिय संस्था हया बंद राहतील.
७. विनाकारण चारचाकी व दुचाकी वरुन वाहतूक करतांना आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक व फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी.

**तसेच संचारबंदीच्या कालावधीत दर आठवडयातील शुक्रवार सायंकाळी ७.०० वा. पासून ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत खालील नमुद केल्याप्रमाणे सेवा हया सुरु राहतील.**

१. सर्व दुध/डेअरी विक्री सेवा केंद्रे सकाळी ६.०० ते सकाळी १०.०० वा. पर्यंत सुरु राहतील.
२. सर्व प्रकारची औषधी दुकाने, औषधालये, रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनिक, औषधी व वैद्यकीय प्रयोगशाळा, रुग्णवाहिका, तसेच अधिकृत खाजगी वैद्यकीय आस्थापना ज्या कोविड-१९ च्या आवश्यकतेच्या सेवा तरतुदींसाठी आहेत त्या सर्व सुरु राहतील.
३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अंतर्गत असलेली सर्व औद्योगिक आस्थापना हया त्यांचेकडील मजुरांसह सुरु राहतील.
४. अत्यावश्यक सेवा अंतर्गत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी अंतर्गत विज सेवा, गॅस सेवा, मान्सूनपूर्व कामे उदा. रोड दुरुस्ती, नाले सफाई, सुरु राहतील
५. यापूर्वी संदर्भिय क्र. ५६ अन्वये लग्नसमारंभाकरीता देण्यात आलेल्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे सदरचेआदेश निर्गमित होण्यापूर्वी ज्यांना लग्नसमारंभाकरीता आयुक्त मनपा, मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत, तहसिलदार यांनी जनता संचारबंदी कालावधीत परवानगी दिलेली आहे त्या लग्न समारंभाकरीता परवानगी राहील. तथापी या पुढील कालावधीत शनिवार व रविवार करीता लग्न समारंभाकरीता परवानगी देण्यात येऊ नये
६. प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, डिटीएच, केबल सेवा, वृत्तपत्रे सेवा (विक्री व वितरण) सुरु राहतील व त्या संबंधित असलेल्या पत्रकार यांना त्यांच्या कामाकरीता संचार करण्याची परवानगी राहील.
७. पेट्रोल/डिझेल पंप यापूर्वी दिलेल्या निर्देशाप्रमाणे नियमितपणे सुरु राहतील.
८. कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शासकीय हमी भावाप्रमाणे खरेदी सुरु राहील.

**या करीता सर्व अमरावती जिल्हयातील सदरची संचारबंदी यशस्वी होण्याकरीता नागरिकांनी सहकार्य करुन खालील दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.**

१. ६५ वर्ष व त्यावरील वृध्द, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला, १० वर्षाखालील मुले यांनी आवश्यक व आरोग्यविषयक कारणांशिवाय घराबाहेर पडु नये.
२. Containment Zone मधील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात यावे तसेच Containment Zone मधील नागरिकांच्या हालचालीस प्रतिबंध करण्यात यावा.
३. ज्यांना अत्यावश्यक कामाकरीता जनता संचारबंदी कालावधीत हालचाल करणे आवश्यक आहे त्यांना मास्क घालणे अनिवार्य राहील.
४. नागरिकांनी संचारबंदी कालावधीत सामाजिक अंतर (Social Distancing) च्या नियमांचे पालन करुन दोन व्यक्ती मध्ये कमीत कमी ६ फुटाचे अंतर राहील याची दक्षता घ्यावी.
५. उपरोक्त प्रमाणे प्रतिबंधित केलेल्या बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालीका क्षेत्रासाठी आयुक्त, मनपा, मुख्याधिकारी नगर परिषद/तहसिलदार यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात आवश्यक त्या उपाययोजना कराव्या त्याच प्रमाणे पोलीस आयुक्त (शहर) व पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये याबाबत कडक नियंत्रण ठेवावे व सर्व नागरिकांना याची माहिती होण्याकरीता व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी

उक्त संचारबंदीचे आदेश आठवडयातील शुक्रवार सायंकाळी ७.०० वा. पासून ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. सदरचे आदेश आज दिनांक ०६/०७/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाव्दारे Public Address System व्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

(शैलेश नवाल) 6/7
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. पोलीस आयुक्त (शहर)/ पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
   **/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
८. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
९. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१०. उपविभागीय दंडाधिकारी ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
११. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१२. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१३. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१४. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१५. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१६. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१७. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
१८. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,नागपुर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुन ५ प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावा.
१९. संबंधित सर्व विभाग -----------------------------यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.